**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रास्थळ योजना "ब" वर्ग (२५१५ २५६६) अंतर्गत यात्रास्थळांच्या ठिकाणी पूर्ण झालेल्या कामांचा उर्वरित निधी वितरीत करणेबाबत. (जिल्हा परिषद, सोलापूर)**

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः तीर्थवि-२०२५/ई- १३६१८१९/योजना-११**
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ
फोर्ट, मुंबई ४०० ००१
**दिनांक: १३ ऑक्टोबर, २०२५**

वाचा:-

१. ग्रामविकास विभाग,शासन निर्णय क्र.तीर्थवि-२०२३/प्र.क्र.१२२/यो-६ दि. ३१.०३.२०२३.
२. जिल्हा परिषद, सोलापूर, बांधकाम विभाग यांचे जा. क्र. जिपसो/बांखा-२/बजेट/४०४५/२०२५ दि. ३०.०७.२०२५ रोजीचे पत्र.
३. जिल्हा परिषद, सोलापूर, बांधकाम विभाग यांचे जा. क्र. जिपसो/बांखा-२/बजेट/२३५/२०२५ दि. २७.०१.२०२५ रोजीचे पत्र.
४. जिल्हा परिषद, सोलापूर, बांधकाम विभाग यांचे जा. क्र. जिपसो/बांखा-२/बजेट/२१३७/२०२५ दि. ०३.०६.२०२५ रोजीचे पत्र.
५. जिल्हा परिषद, सोलापूर, बांधकाम विभाग यांचे जा. क्र. जिपसो/बांखा-२/बजेट/२५४८/२०२५ दि. ३०.०७.२०२५ रोजीचे पत्र.

**प्रस्तावना:-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रास्थळ योजना (ब वर्ग) योजनेंतर्गत उपरोक्त संदर्भ क्र.०१ अन्वये सोलापूर जिल्ह्यातील "श्री लक्ष्मीदेवी देवस्थान लक्ष्मी दहिवडी, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर" या ब-वर्ग यात्रास्थळाच्या ठिकाणी करण्यात येणाऱ्या विकास कामांना **रु. १,२७,०७,०००/-** (रुपये एक कोटी सत्तावीस लक्ष सात **हजार** फक्त) एवढ्या रक्कमेची प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. संदर्भ क्र.२, ३, ४ व ५ अन्वये प्राप्त पत्रानुसार पूर्ण झालेल्या कामांचा उर्वरित निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रास्थळ योजना (ब वर्ग) (कार्यक्रम) (२५१५ २५६६) ३१ सहायक अनुदान या योजनेंतर्गत सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पीत तरतुदीतून संदर्भ क्र.२, ३, ४ व ५ च्या पत्रात नमूद केलेल्या यात्रास्थळाच्या प्राप्त देयकासाठी **रु. ४७,११,३९२/-(रुपये सत्तेचाळीस लक्ष अकरा हजार तीनशे ब्याण्णव फक्त )** इतका निधी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांना वितरीत करण्यात येत आहे. देयकांचे विवरणपत्र खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र | तीर्थक्षेत्राचे नाव | प्रशासकीय मान्यता शासन निर्णय क्रमांक व दिनांक | कामाचे नाव | प्रशासकीय मान्यतेची रक्कम (रू.) | मागणी प्रमाणे वितरित करावयाची रक्कम (रू.) |
|---|---|---|---|---|---|
| १. | श्री लक्ष्मीदेवी देवस्थान लक्ष्मी दहिवडी, ता. मंगळवेढा, | तीर्थवि-२०२३/ प्र.क्र.१२२/यो-६ दि. ३१.०३.२०२३ | १. स्त्री भक्तनिवास बांधकाम. | ३५,२७,०००/- | ४७,११,३९२/- |
| | | | २. भक्तनिवास बांधकाम. | ४५,०८,०००/- | |
| | | | ३. पोहोच रस्ता. | ७,८७,०००/- | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | जि. सोलापूर | | ४. संरक्षक भिंत व पेव्हर ब्लॉक बांधकाम. | १३,३४,०००/- | |
| **एकूण** | | | | **१,०१,५६,०००/-** | **४७,११,३९२/-** |

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांनी सदर निधी खर्च करताना संदर्भ क्रमांक १ येथील शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी व शर्तीचे पालन करावे.

३. सदर खर्च मागणी क्र.एल-०३ "२५१५ इतर ग्रामविकास कार्यक्रम-१९६- जिल्हापरिषद/जिल्हास्तरीय पंचायतींना सहाय्य (००) (०८) ग्रामीण भागातील यात्रास्थळांच्या विकासासाठी विशेष कार्यक्रम (२५१५ २५६६) ३१ सहायक अनुदान (वेतनेतर) या लेखाशिर्षाखाली सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा व त्याच लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

४. वरीलप्रमाणे ज्या कामाच्या प्रयोजनासाठी निधी उपलब्ध करून दिलेला आहे, तो त्याच कामावर तात्काळ खर्च करून, सदर सहायक अनुदानाच्या विनियोजनासंबधीचे उपयोगिता प्रमाणपत्रे, महालेखापाल कार्यालय, मुंबई व या विभागास पाठविण्यात यावी. तसेच वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र: अर्थसं-२०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि. ०७.०४.२०२५ मधील अटीची व शर्तीचे पालन करण्यात यावे.

५. सदर शासन निर्णय नियोजन विभागाच्या मान्यतेने, वित्त विभागाच्या अनौ.संदर्भ क्र. ४९९/२०२५/व्यय-१५, दि. १५.०७.२०२५ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५१०१३१०३३२९४४२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.**

KALU GONYA VALVI

Digitally signed by KALU GONYA VALVI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=RURAL DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=714701FC3DB9C38A46F4CD82E1E450B51A9E92EEDE8C323934F82EDB538D3B20, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=8C5D0F275C3D9A21DB07FECF7919C2D83796E88930D62D44E7A4A6D4CBEE7E0E, cn=KALU GONYA VALVI
Date: 2025.10.13 13:52:28 +05'30'

**( का.गो. वळवी )**
**सह सचिव,महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. राज्यपाल, यांचे सचिव,
२) मा. मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
३) मा. उपमुख्यमंत्री (नगरविकास) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
४) मा. उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
५) मा. मंत्री (ग्रामविकास) यांचे खाजगी सचिव,
६) मा. राज्यमंत्री (ग्रामविकास) यांचे खाजगी सचिव,
७) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१ मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर,
८) महालेखापाल (लेखा परिक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर,
९) विभागीय आयुक्त, आयुक्त कार्यालय, पुणे विभाग, पुणे,
१०) जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर,
११) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर,
१२) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर,
१३) मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर,

१४) जिल्हा कोषागार अधिकारी, सोलापूर,
१५) अवर सचिव नियोजन विभाग, (का-१४४४) मंत्रालय, मुंबई-३२.
१६) अवर सचिव वित्त विभाग (व्यय १५, अर्थसं १६, अर्थसं १७) मंत्रालय,मुंबई ३२.
१७) कार्यासन क्र. वित्त-१, ग्रामविकास विभाग,
१८) निवड नस्ती (का.यो-११).